नवराष्ट्र
www.navarashtra.com

# ‘मेयो’सोबत लीलावती हॉस्पिटलचा करार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती ; अत्याधुनिक तंत्रज्ञानाने उपचार होणार

**मुंबई,** (वा.) मेयो क्लिनिकसोबत लीलावती हॉस्पिटलने सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे ३०० बेडच्या अद्ययावत केंद्राची उभारणी करण्यात येणार असून कर्करोगावर अत्याधुनिक नव्या तंत्रज्ञानाने उपचार केले जाणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती हा करार करण्यात आला. एवढेच नाही तर लीलावती हॉस्पिटलद्वारे जनजागृती उपक्रमही राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजेश मेहता म्हणाले की, आम्हाला ही अत्याधुनिक कर्करोग सेवा संस्था मुंबईत आणताना आणि आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी मेयो क्लिनिकशी सहयोग करताना खूप आनंद होत आहे. हा उपक्रम जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करण्याची आणि रुग्णांचे आणि समाजाचे जीवन सुधारण्याची आमची वचनबद्धता आहे. लीलावती हॉस्पिटलकडून सुरू करण्यात आलेला हा उपक्रम देशातला पहिला उपक्रम आहे. लीलावती ट्रस्ट नेहमी लोकसेवा आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न करत असते. माझी आई आणि लीलावती ट्रस्टच्या संस्थापक ट्रस्टी चारूबेन मेहता यांचा वारसा चालवण्याचा आमचा आटोकाट प्रयत्न असतो. त्यामुळेच जागतिक दर्जाचे मेयो क्लिनिक सोबत कर्करोगावर आम्ही काम करत आहोत. आम्ही नर्सिंग प्रशिक्षण देऊन उपचारांच्या अत्याधुनिक पद्धती अवलंबून रुग्णांना सेवा देणार आहोत.



### हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लीलावतीशी जोडलो होते : शिंदे

जागतिक दर्जाच्या मेयो क्लिनिक सोबत कर्करोगा संदर्भात नर्सिंग प्रशिक्षण उपक्रम सुरू केल्याबाबत मी लीलावती हॉस्पिटलचा हार्दिक अभिनंदन करतो. लीलावतीकडून उभारले जाणारे हे कॅन्सर हॉस्पिटल नाही तर मी त्याला आरोग्य मंदिर म्हणू शकतो. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे लीलावती हॉस्पिटल आवडते होते. ते नेहमी याच हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असत अशी शिंदे यांनी आठवण सांगितली. यावेळी आमदार प्रकाश आबीटकर, राजीव मेहता, खासदार श्रीकांत शिंदे, मंत्री प्रताप सरनाईक, प्रशांत मेहता आदी उपस्थित होते.

Mumbai Plus Edition
Jan 24, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com